**प्रेसनोट** **दि. १२/०७/२०१९**

## सिंहगडरोड पोलीस स्टेशन पुणे शहर

## वाहन चोरास अटक चोरीच्या ४ दुचाकी हस्तगत

सिंहगडरोड पो स्टे कडील तपास पथकातील अधिकारी/कर्मचारी घरफोडी वाहनचोरी गुन्हयांना आळा घालणेसाठी पो स्टे हददीत गस्तीवर असतांना तुकाईनगर सर्कल, वडगाव बु पुणे येथे आले असता एक संशयीत इसम स्प्लेंडर नं. एम एच १२ ए एस ८२८४ या दुचाकी वरुन वेगाने येतांना दिसला. सदर इसमाचा संशय आल्याने त्यास थांबण्याचा इशारा दिला असता तो न थांबता निघुन जाण्याचा प्रयत्न करीत असतांना स्टाफचे मदतीने थांबवुन त्यास त्याचा नाव पता विचारता त्यांने आपले नाव जिवन सुभाष कदम, वय २४ वर्षे, रा. घर नं १०९, गणेश नगर, नवी खडकी तालीम जवळ, येरवडा, पुणे असे सांगीतले. सदर इसमाकडे अधिक चौकशी करता त्याने सदरची गाडी चोरली असल्याची कबुली दिली. त्याचेकडे मिळालेली गाडी ही सिंहगड रोड पो स्टे गुरन १३३/१८ भादवि कलम ३७९ या गुन्हयातील असलेने त्यास दाखल गुन्हयात अटक केली आहे. नमुद आरोपी याचेकडे अधिक चौकशी करता त्याने सांगीतले की, मी पेपरमध्ये पॉम्पलेट टाकणेचे काम करतो. माझेकडे गाडी नसलेने मी लॉक नसलेल्या गाडया काढून ढकलत चावीवाल्याकडे नेतो. तेथे चावी हरवल्याचे सांगुन चावी तयार करून किंवा स्वीच बदलून गाडीचा वापर करतो. गाडीतील पेट्रोल संपलेनंतर गाडी सोडून देतो. पुन्हा दुसरी गाडी चोरून तिचा वापर करतो असे सांगीतले. त्याचेकडुन स्प्लेंडर, ॲक्टीवा यासारख्या एकुण ५५,०००/- च्या चार गाडया हस्तगत करण्यात आलेल्या आहेत.

सदरची कामगिरी पोलीस उपआयुक्त परीमंडळ -३, श्री मंगेश शिंदे, सहा पोलीस आयुक्त सिंहगडरोड विभाग सुधाकर यादव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री दुर्योधन पवार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री दादा गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शिवदास गायकवाड, पोलीस कर्मचारी सहा.पोलीस फौजदार यशवंत ओंबासे, सहा.पोलीस फौजदार वामन जाधव, सचीन माळवे, दयानंद तेलंगे पाटील, दत्ता सोनवणे, श्रीकांत दगडे, पुरूषोत्तम गुन्ला, योगेश झेंडे यांचे पथकाने केली.